सं.फौ.ख.क्र.६८१/२०२३
सरकार-वि- अमोल
नि.क्र. १० पुढे

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष शपथेवर सुरु -**

माझे नाव- महादेव तुकाराम वैरागडे,

वय – ४० वर्षे, व्यवसाय - शेती,

राहणार – कोडशी, ता.कोरपना, जि.चंद्रपूर.

**विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्त्या श्रीमती टि.बी.नेवारे यांचेमार्फत सरतपास-**

घटना तिन वर्षापुर्वी तांबाडी जवळ सायंकाळी ०५.०० ते ०६.०० वाजताच्या सुमारास घडली. घटनेदिवशी मी व माझी पत्नी पार्वताबाई तांदुळ आणण्याकरिता सदरपुर ता. बेला, येथे गेलो होतो. तेथुन आम्ही कोरपना पर्यंत बसने आलो. तेंव्हा ०५.०० वाजले होते. त्यानंतर आम्ही कोडशी येथे पैदल जात होतो. आम्ही जात असतांना, चौपाटीहुन थेरे पाटील हा त्याची स्कुटी घेऊन हळुहळु येत होता. त्याने गाडी थांबवली व आम्ही त्याच्या गाडीवर बसलो. तांबाडी गावाजवळील पुलाजवळ गेलो असता, अमोल मालेकर याने त्याची गाडी गांधीनगर कडुन येत असतांना आमच्या गाडीला धडक दिली. धडक दिल्यामुळे आम्ही तिघेही खाली पडलो. मी बेशुध्द झालो. मला डोक्याला व कमरेला मार लागला. दिनकर पाटील यांच्या डोक्याला (माथ्याला) मार लागला. माझ्या पत्नीला कमरेवर मार लागला. आरोपीने त्याच्या दुचाकीने आमच्या दुचाकीला धडक दिली होती. मी बेशुध्द झालो म्हणुन मला काही माहिती नाही. लोक मला कोरपना रुग्णालयात घेऊन गेले. पोलीसांनी माझे दवाखान्यात बयाण घेतले होते. त्यावर माझा अंगठा घेतला होता. अंगठा घेण्यापुर्वी त्यांनी मला माझे बयाण वाचुन दाखविले होते. ते खरे व बरोबर होते (सदर बयाणाला तोंडी रिपोर्ट म्हणुन ग्राह्य धरण्यात आले.). त्यास **<u>निशाणी क्र. ११</u>** देण्यात आले.

२. दिनकर पाटील यांचा जागेवरच मृत्यु झाला. मी आरोपीला पाहिले होते. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपासपूर्ण.**
**आरोतीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एस.बी. मुसळे वकील साहेब यांच्यामार्फत सुरू.**

३. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनेची तारीख माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटनेच्यावेळी अंधार पडला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी गाडीचे लाईट लागले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तांबाडी फाटा ते कोडशी रस्त्यावर खड्डे पडले होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही तांदुळ आणायला गेलो होतो.

**प्रश्न:** तुमच्या जवळ किती किलो तांदुळ होते ?
**उत्तर:** १०-१२ किलो तांदुळ होते.

४. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथील घटनेवेळी दिनकर थेरे पाटील यांचे वय ६६-६७ वर्षे होते.

**प्रश्न:** दिनकर पाटील यांच्या मुलीचे वय सांगत येते का ?
**उत्तर:** मला सांगता येत नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, दिनकर पाटील हे माझ्यापेक्षा वयाने थोडे मोठे होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही दोघेही पती-पत्नी दिनकर पाटील यांच्या स्कुटीवर तांदुळ घेऊन बसलो.

६. हे म्हणणे खरे आहे की, तांबाडी गाव संपल्यानंतर एक छोटे पुल (रापट) आहे. हे म्हणणे खरे आहे की, रापट संपल्यानंतर डाव्या हातावर सुरेश पाटील मालेकर यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, रापट संपल्यानंतर उजव्या बाजुला थोडी मोड आहे, ज्याठिकाणी रापट आहे, त्याठिकाणी थोडा उतार आहे. हे म्हणणे खरे आहे की, थोडा उतार असल्यामुळे तेथुन वाहन वेगाने जाते. हे म्हणणे खरे आहे की, कोडशी, गांधीनगर व तुळशी या गावाला जाणारा रस्ता हा एकमेव तोच रस्ता आहे व त्या रस्त्याने वाहनांचे जाणे-येणे सुरू असते. हे म्हणणे खरे नाही की, ज्या रापट्यावरुन आम्ही जात होतो, त्या रापट्यावर गड्डे पडले होते. हे म्हणणे खरे नाही की, रापट्यावर गड्डे असल्यामुळे व गड्यातुन गाडी गेल्यामुळे तसेच गाडीवर आम्ही तिघेजण बसुन असल्यामुळे, तोल जाऊन गाडी पडली व त्यामुळे आम्ही जखमी झालो व त्यामुळे दिनकर पाटील मरण पावले.

७. हे म्हणणे खरे आहे की, मला लिहिता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला माझे बयाण वाचुन दाखविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी

कोणत्या तारखेला माझे बयाण घेतले हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला घटनेपुर्वीपासुन ओळखतो.

८. हे म्हणणे खरे आहे की, गांधीनगर व कोडशी चे एकच गट ग्रामपंचायत आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोल्हे हा ग्रामपंचायतचा सरपंच आहे. कोल्हे हा गांधीनगरचा सरपंच आहे. हे म्हणणे खरे नाही की, उमेश कोल्हे हा गांधीनगरचा आहे, तो सरपंच झाल्यामुळे दोन्ही गावांमध्ये वाद आहे. हे मला माहिती नाही की, आरोपी हा नेहमी सरपंच उमेश कोल्हे सोबत राहतो व त्यांच्या पक्षाचे काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या गावातील लोकांच्या सांगण्यावरुन आरोपीने आमच्या गाडीला धडक दिली असे मी माझ्या बयाणात सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, अमोल मालेकर याने धडक दिल्यामुळे मला डोकयाला व कमरेला मार लागला. दिनकर पाटील यांच्या डोक्याला (माथ्याला) मार लागला, माझ्या पत्नीला कमरेवर मार लागला, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनकर पाटील हे वयोवृध्द होते, आम्ही गाडीवर तिघेजण असल्यामुळे दिनकर पाटलांचा तोल गेला व आम्ही पडलो, माझ्यावर कार्यवाही होईल त्या भितीने मी आरोपीविरुध्द खोटे बयाण दिले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा असुन, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा./-
**(दिक्षा दिलीप सहारे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(२ रे कोर्ट), कोरपना.

दि.१३/०४/२०२६